**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**TERM - I (2022-2023)**

**STD: VII** **MARKS :40**
**SUB: MARATHI** **TIME:2 HRS.**

---

**प्र.१)उतारा वाचून प्रश्नांची एका शब्दात किंवा एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)**

सुधा मूर्ती एक भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध भारतीय लेखिका आहेत. मूर्ती यांनी संगणक शास्त्रज्ञ आणि अभियंता म्हणून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात केली. त्या इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि गेट्स फाउंडेशनच्या सार्वजनिक आरोग्य सेवा उपक्रमांच्या सदस्या आहेत. त्यांनी अनेक अनाथाश्रमांची स्थापना केली, ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांमध्ये भाग घेतला, कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला आणि हार्वर्ड विद्यापीठात 'द मूर्ती क्लासिकल लायब्ररी ऑफ इंडिया'ची स्थापना केली.मूर्ती यांनी कर्नाटकातील सर्व शाळांमध्ये संगणक आणि ग्रंथालय सुविधा सुरू करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले आणि संगणक विज्ञान शिकवले. 1995 मध्ये त्यांना रोटरी क्लब बंगलोर येथे "सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार" मिळाला. मूर्ती हे त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील साहित्यातील योगदानासाठी ओळखले जातात.

प्रश्न १) सुधा मूर्ती यांचे सामाजिक कार्य लिहा. (२)

२) सुधा मूर्ती यांनी कशासाठी धाडसी पाऊल उचलले? (१)

३) एक भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका म्हणून यांना ओळखले जाते? (१)

**ब.) उतारा वाचून प्रश्नांचे एका शब्दात किंवा एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)**

खेळ हा शब्द ऐकला की अगात उत्साह संचारतो ना? खेळ हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. मग तो खेळ मनोरंजनासाठी, स्पर्धेसाठी असेल किंवा व्यायामासाठी असेल.तम्हाला माहित आहे का, खेळाचा पण इतिहास आहे. आपल्याला आत्ताचे सगळे बैठे व मैदानी खेळ माहित आहेत. आता तुम्हाला खेळाची नावे विचारली तर तुम्ही मैदानी खेळ व बैठे खेळ या खेळाची माहिती सांगाल.परंतू ज्यावेळेस आधुनिक तंत्रज्ञान नव्हते, आतासारखी खेळाची विविध साधने त्यावेळी मुले मुली काय खेळत असतील?तुम्हाला त्याच खेळाची माहिती या धड्यातून मिळणार आहे. नुसती माहिती उपयोग. आधुनिक व मुबलक साधने नसतानाही हे खेळ खेळले जायचे.

प्रश्न १) खेळाचे दोन प्रकार कोणते?

२) खेळ हा शब्द ऐकला की काय होते?

३) खेळ आपण कशा कशासाठी खेळतो?

४) पूर्वीच्या काळी खेळ खेळण्यासाठी काय उपलब्ध नव्हते?

**प्र.२.अ.खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन). (४)**

१) उत्कृष्ट वक्तृत्वासाठी आवश्यक गुण कोणते?

२) 'खेळाच्या विश्वात'या पाठातील तुम्हाला आवडलेला खेळ कोणता व का हे स्पष्ट करा.

३) गाव प्रमुखांनी धर्माला जमीन घेण्यासाठी कोणत्या अटी घातल्या?

**प्र.२.ब. एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **(३)**

१) सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह कोणता?

२) नदीला कशाचा ध्यास आहे?

३) कथाकथनाचा कार्यक्रम ऐकल्यावर आदित्यने काय ठरविले?

**क) कवितेच्या ओळींचा भावार्थ स्पष्ट करा.** **(२)**

१) गुरु श्रेष्ठ हा निसर्ग राजा कणाकणातून शिकवी,
केवळ दुसऱ्यांसाठी जगणे हीच जीवन रीती!

**प्र.३.अ)खालील वाक्य कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१) "मित्रांनो,हाच तो क्षण,ज्याची आपण आतुरतेने वाट पाहत असतो"

२) "वक्तृत्व म्हणजे आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याची कला."

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.** **(३)**

(प्रभावी,सागरगोटा,ऋतूंचे)

१) ____________ हे काटेरी झाड आहे.

२) सुरुवात आणि समारोप ___________असायलाच हवे.

३) तिन्ही _________येणे जाणे मुग्ध निसर्गाची गाणी.

**प्र.३.क) खालील वाक्प्रचाराचा योग्य वाक्यात उपयोग करा.** **(२)**

१) प्रोत्साहन देणे २) हुरूप येणे

**प्र.४.अ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन).** **(२)**

१) विरंगुळा २) लहेजा ३) बातमी

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) साहसी × २) बैठे × ३) ज्ञानी ×

**क) वचन बदला. (कोणतेही दोन)** **(२)**

१) वस्ती २) उत्तर ३)अट

**प्र.५.अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** **(४)**

१) **<u>५०</u>** गावे त्यांनी दत्तक घेतली.

२) जय जवान जय **<u>किसान</u>** हा नारा त्यांनी दिला.

३) पाऊस अचानकच **<u>पडला</u>**.

४) **<u>हा</u>** माझा प्रांत नाही.

**ब.) खालील वाक्यांचा काळ ओळखा.** **(१)**

१) काम हे नेहमी आनंदासाठी करायला हवे.

२) गणेश उत्सव छान साजरा झाला.

**क.) खालीलपैकी कोणतीही एक कृती करा.** **(५)**

१) 'माणुसकी हाच देव' या शीर्षकावरून कथा तयार करा व तात्पर्य लिहा.

२) 'कलेचे महत्व' या विषयावर निबंध लेखन करा.